**शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत <u>वाढ/घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(१५७/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३० जून, २०११.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी.
२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०११/ ३२२५-अ, दिनांक ३० जून, २०११.

**<u>शासन निर्णय</u>** : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** प्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनांक ३० जून, २०११ च्या पत्रान्वये सादर केली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकाररित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेवय संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०) दुस-या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक नाहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालकांमार्फत).
कुलसचिव, (संचालकांमार्फत).
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

**प्रत माहितीसाठी :-**
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती/तांशि-४